| **नियमित दिवाणी दावा क्र.५५०/२०२४ मधील निशाणी क्र.५१ खालील आदेश**<br>**(चांगदेव विठ्ठल टकले व इतर विरुध्द खंडू ठकाजी कोकरे व इतर)** | MHAH140009762024 |
|---|---|

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी त्यांच्याविरुध्द निशाणी क्र. ४७ वर झालेला विना म्हणणे आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादी यांनी शपथपत्र जोडलेले आहे.

२. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी सदर अर्जात कथन केले आहे की, निशाणी क्र. ४७ वरील अर्जासंबंधी महत्वाची कागदपत्रे व माहिती वेळेत उपलब्ध न झाल्याने ते निशाणी क्र. ४७ वर मुदतीत म्हणणे दाखल करू शकले नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरूध्द निशाणी क्र. ४७ वर विना म्हणणे आदेश पारीत केला आहे. निशाणी क्र. ४७ वरील अर्ज दुतर्फा चालवण्यासाठी तसेच दावा हा स्थावर मिळकतीसंदर्भात असल्याने त्यावर प्रतिवादींचे म्हणणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ व ३ यांच्याविरुध्द निशाणी क्र. ४७ वर झालेला विना म्हणणे आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळावी.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, सदरचा अर्ज व त्यातील मजकूर वादींना मान्य व कबुल नाही. सबब, जास्तीत जास्त दंड

आकारूण अर्ज रद्द करण्यात यावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी प्रस्तुत अर्जात नमूद केलेल्या कारणाच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. असे असले तरी देखील निशाणी क्र. ४७ वरील अर्ज हा मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जाची गुणदोषावर पुर्णतः चौकशी होणेकरीता दोन्ही बाजुंचे म्हणणे व पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी क्र. १ व ३ यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे योग्य ठरेल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.१ व ३ यांच्याविरुध्द निशाणी क्र. ४७ वर झालेला विना म्हणणे आदेश दंडासह रद्द करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी वादीस दंडापोटी रक्कम रुपये २००/- (रक्कम रुपये दोनशे फक्त) दयावेत.

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.02.10 17:49:14 +0530

**(संध्या यु. सुळ)**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण- नेवासा
दिनांक – ११/०२/२०२६